
तत्सुखसुखित्वम्

अंक ८८ वा

# अंतरंग

२०२०-२१




नागपूर शिक्षण मंडळ द्वारा संचालित

## श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर

Naac Reaccredited (III Cycle) B++ Grade With CGPA 2.87

E-mail : sbct_1@yahoo.co.in Website : www.binzanicitycollege.ac.in

# महाविद्यालयाचे आश्रयदाते

## संस्थापक दानदाता



**स्व. श्री. आईदानजी बिंझाणी**

१९४५ ते २६-५-१९६०

❁ नागपूर शिक्षण मंडळाचे प्रमुख पदाधिकारी ❁

## नव्या क्षितिजाची वाटचाल

अध्यक्ष
नागपूर शिक्षण मंडळ, नागपूर



माननीय श्री. अशोकजी गांधी

कार्यवाह
नागपूर शिक्षण मंडळ, नागपूर



माननीय डॉ. श्री. हरीशजी राठी

# श्री बिंझाणी नगर महाविद्यालय

अंक ८८ वा

# अंतरंग

२०२०-२१

## श्रेय नामावली

### संपादक मंडळ २०२०-२१

• प्रभारी प्राध्यापक •

डॉ. सदानंद धकिते, डॉ. संदीप तुंडूरवार, डॉ. नरेंद्र घरत

• महाविद्यालय प्रतिनिधी •

कु. विद्या सोमनाथे, एम.ए.भाग २(राज्यशास्त्र), कु. राणी हिरडकर, एम.ए.भाग २(राज्यशास्त्र)
कु. रजनी दिघोरे, एम.ए.भाग १(मराठी), श्री. आशिष खोब्रागडे, एम.ए. भाग १(मराठी)
कु. कल्याणी सुर्यवंशी, बी.ए.भाग १, कु. रसिका भगत, बी.ए.भाग २
कु. पल्लवी गभणे, बी.कॉम.भाग १, कु. रसिका भगत, बी.कॉम. भाग १
श्री. गोविंद पांडे, बी.कॉम.भाग १, कु. ईश्वरी प्रधान, बी.ए. भाग १

• प्रकाशक •

डॉ. सुजित मेत्रे

प्राचार्य, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय

• मुद्रक •

कुसुमदेव एंटरप्राईजेस, ४४, कबीर नगर, नंदनवन मेन रोड, नागपूर-९

Mob. : 8275225920, Email : kusumdeoent@gmail.com

टिप : या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक, प्रभारी प्राध्यापक आणि संपादक सहमत असतीलच असे नाही-

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| आत्मनिर्भर भारतातील युवा आणि कौशल्य | 3 |
| आत्मनिर्भर भारत | 5 |
| आत्मनिर्भरतेची शक्ती | 6 |
| सुविचार | 7 |
| Activities of The College: 2020 - 2021 | 9 |
| Department of Economics | 10 |
| Department of Political Science | 11 |
| Vidyarambh | 13 |
| Vachan Prerna Din | 14 |
| RTPCR Test Programme” | 14 |
| Two Day Online International Conference | 15 |
| Department of Sanskrit | 16 |
| Constitution Day Programme | 17 |
| Sawitribai Phule Jayanti Programme | 18 |
| National Youth Day Program | 18 |
| National Voter's Day | 18 |
| Pulse Polio Campaign Programme | 19 |
| International Women's Day Programme | 19 |
| Anti Terrorist Day (Pledge) Activity | 20 |
| Shivswarajya Din Programme | 20 |
| World Environmental Day Programme | 21 |
| International Yoga Day Programme | 21 |
| Report of Short Term Training Program | 22 |
| Department of English | 23 |
| Report of Administrative Staff Training Program | 24 |
| Report of Short Term Training Program | 24 |
| Report of Lifelong Learning & Extension Cell | 25 |
| क्रीडा अहवाल | 26 |
| मराठी विभाग | 28 |

# प्राचार्यांचा संदेश



**डॉ. सुजीत मेत्रे**
प्राचार्य
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाच्या अंतरंग या वार्षिकांकाचे ८८ वे प्रकाशन करतांना अतिशय आनंद आणि अभिमान वाटत आहे. नागपूर शहरातील जुन्या शैक्षणिक संस्थांपैकी एक नावाजलेल्या, ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या आणि शतकाकडे वाटचाल करीत असलेल्या या शैक्षणिक संस्थेत प्राचार्य म्हणून मिळालेली संधी माझ्याकरिता एक अभिमानाची बाब आहे.

आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत अग्रक्रमांक प्राप्त करण्याचा बहुमान मिळविण्याच्या परंपरेत सातत्य राखत यशाचे शिखर गाठले आहे. एम.ए. राज्यशास्त्र, एम.ए. मराठी आणि बी.ए. च्या विद्यार्थ्यांनी हे सुयश संपादित केले.

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद नॅक व्दारे महाविद्यालयास B++(2.87 CGPA) हा दर्जा Third Cycle मध्ये प्राप्त झालेला आहे. विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्याकरिता अभ्यासासोबतच विविध स्पर्धा, उपक्रम, कार्यक्रम, राष्ट्रीय परिषदांचे आयोजन वेगवेगळ्याा विभागांद्वारे करण्यात आले. NSS, NCC, Lifelong Learning मराठी अभ्यास मंडळ यांच्या द्वारे शैक्षणिकेत्तर उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग आणि त्यांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील २७०० विद्यार्थ्यांच्या अध्ययनाकरिता सुमारे ५२००० ग्रंथ असणारे समृद्ध ग्रंथालय उपलब्ध आहे.

आजचा विद्यार्थी उद्याचा सुजाण नागरिक म्हणून विकास पावावा याकरिता त्यांच्यात असणाऱ्या सुप्त कला-गुणांना-विचारांना वाव दिल्या जातो आणि त्याप्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते. महाविद्यालयाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या वार्षिकांक 'अंतरंग'मध्ये विद्यार्थ्यांना विविध संकल्पनांवर आधारीत लेख, कविता, स्फुट लेखन लिहिण्याची अपूर्व अशी संधी उपलब्ध करून देण्यात आली. आपली कलात्मकता आणि सामाजिक बांधिलकी यांची जाणीव त्यांच्या लेखातून अभिव्यक्त झालेली आहे.

यावर्षीचा 'अंतरंग' अंक ''आत्मनिर्भर भारत'' या संकल्पनेवर आधारित आहे. आत्मनिर्भर भारताविषयी विद्यार्थ्यांना काय वाटते? याचं प्रतिबिंब या अंकात बघायला मिळते. तद्वतच आपल्या महाविद्यालयातील उपक्रमाबाबतचे विविध रंग हे या अंतरंगाचे वैशिष्ट्या होय. संपादक मंडळ, लेखक यांनी अथक परिश्रम केल्यानंतर अंतरंग हा वार्षिकांक आकारास आला आहे. सुज्ञ वाचक आणि विद्यार्थी यांना यातून नक्कीच प्रेरणा मिळेल अशी आशा बाळगतो.

# मराठी विभाग

## ''आत्मनिर्भर भारतातील युवा आणि कौशल्य''

माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी दि. १२ मे २020 ला अशा अभियानाची घोषणा केली. ज्याद्वारे प्रत्येक भारतीय नागरिक देशाला समृद्ध बनविण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे ठेवू शकतो, ते म्हणजे आत्मनिर्भर भारत अभियान.

आपणा सर्वांनाच माहिती आहे की, कोरोना विषाणूमुळे संपूर्ण देशावर लॉकडाउनची भयावह परिस्थिती ओढवली. परंतु अशा भयावह परिस्थितीतून आपण संधी साधून काढू शकतो. प्रत्येक व्यक्ती या समस्येतून बाहेर पडू शकतो. स्वत:जवळ असलेल्या कलेतून आणि कौशल्यातून रोजगार निर्मिती करुन प्रत्येक भारतीय एक जबाबदार व्यक्ती बनूच शकतो. संपूर्ण देशात उदयोग चळवळ उभी करुन देशाची आर्थिक संपन्नता वाढवू शकतो.

'उद्धरावा स्वये आत्मा।' ही सनातन भारतीय दृष्टी आहे. आपल्या उद्धारासाठी आणखी कोणीतरी कोठून तरी येतील. 'हि असेल माझा हरि .....या पद्धतीची विचारसरणी नाकारुन 'तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार' ही शिकवण आपल्या देशात अनेकांनी जनमानसात रुजविण्याचे प्रयत्न केले आहे. आत्मनिर्भर भारताची हाक ही त्याच परंपरेतले पुढचे पाऊल आहे.

सगळयात महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधानांनी आत्मनिर्भरतेच्या सुत्रांची मांडणी नेमकी याच वेळेस का केली? याचे उत्तर आपल्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही परिस्थितीच्या संदर्भात देता येवू शकते किंवा दयायलाच पाहिजे. यातील आंतरराष्ट्रीय संदर्भ पी.पी.ई. किट्स, चांगली यंत्रे, मुखावरणे आणि औषधांच्या संदर्भातील आहे. हायड्रोक्लोरीनच्या गोळया आपण मोठया संख्येत इतर देशांनाही पुरविल्या. पण इतर सामुग्रीसाठी सुरुवातीस आपण परावलंबी होतो. शिवाय सामुग्री चीनमधून आयात करणे म्हणजे संसर्ग बोधला आमंत्रण देण्यासारखेच होते. संगणकापासून संरक्षण उत्पादनापर्यंत आपण आत्मनिर्भर झालो. मेक इन इंडिया चा आग्रही पुरस्कार करीत स्वत:च्या पायावर उभे राहिलो तर भविष्यात उद्‌भवू शकणाऱ्या सर्व पेच प्रसगांना आपण यशस्वीपणे तोंड देऊ शकू.

देशाअंतर्गत विषयांमध्येही आत्मनिर्भरता आवश्यक आहे. ग्रामस्वराज्य हा या अभियानाचा प्रारंभ बिंदू आहे. उत्तरप्रदेश सारख्या राज्याने एक जिल्हा एक उत्पादन हे सुत्र समोर ठेवून स्थानिक कारगिरीला प्रोत्साहन देण्याचा जो उपक्रम सुरु केला आहे, तो ही आत्मनिर्भरतेच्या दिशेने घेवून जाणारा आहे. अन्नधान्याच्या बाबतीत तर आपण पूर्वीच आत्मनिर्भर झालो आहे. पण ऊर्जा, पाणी संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, औषधनिर्माण ..... अशा अनेक क्षेत्रात आपण आणखी आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. त्यासाठी स्वकुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची गरज आहे. उदा. महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत आज सुतारकाम, इलेक्ट्रिशन्स, गवंडी काम, इमारत निर्माण अशा अनेक क्षेत्रात परप्रांतीय मनुष्यबळ आहे. सध्या हे श्रमिक आपल्या मूळ गावी परत गेले आहे. व त्यांची जागा भूमिपुत्रांनी घ्यावी अशी राज्य प्रशासनाची इच्छा आहे. पण हे घडून येण्यासाठी स्थानिक मनुष्यबळाची मानसिकता बदलावी लागेल, आणि या दिशेने प्रयत्न करणे आत्मनिर्भर होण्यासाठीचाच भाग ठरेल.

१९९१ नंतर आपल्या देशाने एक प्रकारची अपरिहार्यता का होईना वैश्विकरण स्वीकारले. पण वैश्विकरणाच्या आधीच जर आत्मनिर्भरतेवर भर दिला असता तर वैश्विकरण कदाचित आपल्याला अधिक भारतानुकूल झाल्याचे दिसून आले असते. पं. दिनदयाल उपाध्याय व महात्मा गांधी २६ जून १९२४ च्या 'यंग इंडिया' च्या अंकात म्हणाले होते. भारतीय संस्कृतीची प्रतिभाशक्ती अबाधित राखणे हिच माझी स्वराज्य संकल्पना आहे. मला नवी मुळाक्षरे गिरवायची आहेत. पण ती भारतीय पाटीवर मी पश्चिमेकडून उधारीवर अनेक बाबी घेण्यास तयार आहे पण हे तेव्हाच शक्य होईल. जेव्हा मी ही उधारी बऱ्यापैंकी व्याजासह परत करण्याच्या स्थितीत येईल.

आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत आखण्यात आलेले बहुतांश कार्यक्रमांचे उद्दिष्ट्ये ग्रामिण आणि शहरी लोकांच्या उपजिविकेचे रक्षण करुन अर्थव्यवस्थेला गती देणे हे आहे. युवा-शक्ती ही देशाची खरी शक्ती आहे. भारताला इतर देशांपेक्षा असलेला हा फायदा आहे की, येथील ६५% लोकसंख्या ३५ वर्षे किंवा त्याहून कमी वयाची आहे. तर ५0% लोकसंख्या २५ वर्षे वयापेक्षा लहान आहे. मनुष्यबळाच्या बाबतीत भारताकडे असलेली ही समृद्धीच असून तिचा वापर झाला पाहिजे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नेतृत्व भारतीय व्यक्ती करीत आहे. भारतात ज्ञान आणि हुशारीची कमतरता नाही. हाच त्याचा अर्थ आहे. परंतु तंत्रज्ञाना धारित २१ व्या शतकात

रोजगारासाठी आवश्यक असणारी कौशल्ये वाढविण्यावर भारताने भर द्यायला हवा. स्वावलंबनाचा मार्ग त्यातून प्रशस्त होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी १५ जुलै २०२१ रोजी जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने देशाला संबोधित करतांना म्हणाले, तरुणांच्या नव्या पिढीच्या कौशल्य विकास, एक राष्ट्रीय गरज आहे. आत्मनिर्भर भारताचा तो मोठा आधार आहे. कौशल्याद्वारे स्वत:ला आणि देशाला स्वावलंबी बनविले पाहिजे. आज कौशल्यांना जास्त मागणी आहे. स्किल इंडियाचे ध्येय आपल्याला नव्याने चालवायचे आहे.

पीपीई किटपासून व्हेन्टिंलेटरपर्यंत अनेक वस्तुंचे उत्पादन भारतात सुरु झाले असून संरक्षण संस्थेकडून (डीआरडीओ) सुमारे ७० वस्तुची निर्मिती झाली आहे. प्राणवायू नावाच्या अत्यंत स्वस्त व्हेन्टिलेटरची निर्मिती रुरंकी येथे झाली. तर कर्नाटकातील स्टाट्र आसनीही काही वस्तू बनविल्या अशा प्रतिभाशाली युवकांची फळी भारताकडे असल्यामुळे नव्या कौशल्यासह नव्या जगाच्या आव्हानांना भिडणे भारताला अन्य देशांपेक्षा अधिक शक्य आहे. भारतीय उत्पादनांना भारताबाहेर आणि भारतात अधिक प्रसिद्धी करण्याचा हेतू आहे. लोक से व्होकल या घोषणेचा उद्देश लोकल उत्पादने ग्लोबल व्हावीत त्यासाठी भारतीय ब्रँड जागतिक दर्जाचे बनविणे असा प्रयत्न आहे.

समाजातील सर्व घटकांना बरोबर घेवून त्यांचा सर्व समावेशक स्तर वाढविणे ज्यामध्ये शैक्षणिक, कौशल्य आदि प्रशिक्षण देवून त्यांना त्या त्या क्षेत्रामध्ये उत्कृष्ट प्रभावित झालेल्या समाजातील प्रत्येक नागरिक आपली जबाबदारी स्वत:हून स्वीकारुन आत्मनिर्भर भारत, उत्कृष्ट भारत हे ब्रीद घेवून भारताला विश्वगुरु बनविण्याच्या मार्गावर पादांक्रात होईल.

**कु. प्रतिभा प्रविण वानखेडे**

# आत्मनिर्भर भारत

आयुष्याचा या प्रवासात
आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा आहे.
जबाबदारीची जाणीव पुन्हा
करुन घ्यायची आहे,
सर्व एकत्र येऊन कोरोना सारख्या
इतर संकटांवर मात करायची आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
झालं गेलं विसरुन आता
अर्थव्यवस्थेचा विकास करायचा आहे,
तुटलेल्या मनाचा पुन्हा
विश्वास मजबूत करायचा आहे,
सर्व एकत्र येऊन मेहनत करुन
आता समोर जायचं आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
होवू आपण आत्मनिर्भर असं काहितरी
आपल्याला करायचं आहे,
देशाला आपल्या पुन्हा
एकदा सोनेकी चिडिया बनवायचं आहे,
सर्व एकत्र येऊन या स्वप्नाला
आता पूर्ण करायंच आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
विदेशी वस्तूचा बहिष्कार करुन
स्वदेशी आपल्या पुन्हा एकदा
देशाला आपल्या पुन्हा एकदा.
विश्वगुरु बनवायचा आहे,
सर्व एकत्र येऊन हात पकडून
यश मिळवायचं आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
गरिबांच्या कौशल्याला ओळखून
त्यांचा मान वाढवायचा आहे,
माझ्या भारतवासियांनो पुन्हा एकदा
आपल्याला समोर जायचं आहे,
सर्व एकत्र येऊन हिंमत करुन
हे करुन दाखवायचं आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
शेतकऱ्यांच्या मेहनतीची जाणीव करुन
त्यांचा हक्क त्यांना मिळवून दयायचा आहे
आपल्यातील क्षमतेला पुन्हा एकदा
दाखवायचं आहे,
सर्व एकत्र येऊन निश्चय करुन
हा बदल करायचा आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
देशाला अभिमानी नाही तर
स्वाभिमानी सुदधा बनवायचं आहे,
आत्मनिर्भरतेची गरज पुन्हा एकदा
समजायची आहे,
सर्व एकत्र येऊन देशाला
वेगळा दर्जा दयायचा आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
युवा कौशल्याचा वापर करुन
आपल्या देशालाच नाही तर,
पूर्ण विश्वाला आत्मनिर्भर बनवायचं आहे,
युवा कौशल्याची ताकद पुन्हा एकदा
दाखवायची आहे,
सर्व एकत्र येऊन हे कार्य
आपल्याला संपन्न करायचं आहे,
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....
कारण आता आपल्याला आत्मनिर्भर भारत बनवायचा
आहे....

**कु. राणी अनिलराव हिरडकर**
एम.ए. अंतिम वर्ष(राज्यशास्त्र)

# आत्मनिर्भरतेची शक्ती

आपला भारत हा एक मोठा आणि संसाधित देश आहे. भारतामध्ये प्रत्येक स्त्रोत पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. आणि प्रत्येक प्रकाराच्या वस्तु किंवा सामुग्रीचे उत्पादन स्वत:च करु शकतो. यासाठी इतर कोणत्याही देशावर अवलंबून राहण्याची गरज नाही. हे करण्याकरीता देशातील प्रत्येक तरुणांमध्ये इच्छाशक्ती आणी कामात कौशल्य असणे खूप महत्त्वाचे आहे असे नाही की आपल्या देशात अशा लोकांची कमतरता आहे. आपल्या देशात असे बरेच लोक आहेत. जे देशासाठी काहीही करु शकतात.

आत्मनिर्भरतेचा अर्थ असा की, आपला देश प्रत्येक क्षेत्रात स्वत:वर अवलंबून आहे. यासाठी इतर कोणावरही मदतीसाठी अवलंबून राहणार नाही आम्ही वापरत असलेली वस्तू असू दया. जी सर्वात छोटी असो वा सर्वात मोठी असो अशा वस्तूंसाठी इतर कोणत्याही देशासमोर हात पसरवण्याची गरज नाही.

आत्मनिर्भरता ही प्रत्येक व्यक्तीसाठी सर्वोत्तम गुणवत्ता आहे. जर एखादी व्यक्ती स्वावलंबी असेल तर त्याला दुसऱ्याची फारच क्वचितच गरज असेल आणि सर्वात मोठया अडचणीवर तो सहज मात करु शकेल. स्वावलंबी असणे हे निश्चितच एखादया देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे.

आत्मनिर्भरतेची आज भारताला गरज का निर्माण झाली? तर आज नवीन युगाची नवीन आव्हाने भारतासमोर उभी ठाकली आहे. अशा परिस्थितीत भारताने आत्मनिर्भर बनने ही काळाची गरज आहे. भारताकडे युवा लोकसंख्या सर्वाधिक असून सध्याची संसर्ग काळानंतर जण आणि जीवनशैली बदललेली असणार आहे. नव्या जगात नव्या कौशल्यांची आवश्यकता भासणार असून युवकांना ही कौशल्ये आत्मसात करण्याकडे लक्ष दयायला हवे. संसर्गानंतर भारताला जगातील अन्य देशांपेक्षा अधिक जलद गतीने सावरण्याची गरज असून कौशल्याने युक्त युवापीढी हाच या प्रक्रियेचा पाया असणार आहे. म्हणून आत्मनिर्भर भारत अभियानात कौशल्य विकासावर भर द्यावा लागणार आहे.

आजच्या युवकाने फक्त नोकरीच्या मागे न लागता आपल्या सुप्त गुणांना ओळखून सृजनशीलतेला वाव देऊन नवनिर्मिती करण्याची गरज आहे. तेव्हाच आजच्या परिस्थितीत भारत सक्षमपणे उभा राहू शकेल. स्वत:च्या हिंमतीवर जग बदलण्याची ताकद युवकांमध्ये असते. तेच आपल्या भविष्याचे शिल्पकार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक युवा कौशल्यदिनाच्या निमित्ताने देशाला संबोधित करतांना आपल्या भाषणात ते म्हणाले, तरुणांच्या नव्या पिढीचा कौशल्य विकास एक राष्ट्रीय गरज असून आत्मनिर्भर भारताचा एक खूप मोठा आधार आहे. गेल्या सहा वर्षात बनलेल्या नव्या संस्थांच्या पूर्ण ताकदीने आपल्याला स्किल इंडिया मिशनला गती दयावी लागेल.

पंतप्रधान मोदींनी केंद्रात सत्तेची सुत्रे स्विकारण्यापूर्वी व त्यानंतरही वेळोवेळी केलेली वक्तव्ये त्यांनी आणलेल्या योजनांची नामाभिधाने व त्यामागची भूमिका भाजपाने अधिक विषयात वेळोवेळी केलेली मांडणी, बुद्धांनी सांगितलेला 'अत्त दीप भव' संदेश या सर्वांमधील समानदृष्टी लक्षात घेतली तर आत्मनिर्भर भारताची कल्पना नवीन म्हणजेच अपरिचीत वाटण्याचे कारणच नाही. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, विनोबा भावे यांच्या विचारात त्यांनी दिलेल्या संदेश आणि उपदेशात सापडते.

आत्मनिर्भरतेची शक्ती ही मूळातच आपल्या देशातील तरुणांमध्ये पूर्वीपासून आहे फक्त जागृत करण्यासाठी किंवा ती समजण्यासाठी आपल्याला आत्मपरीक्षणाची गरज आहे. १९ व्या शतकामध्ये विवेकानदांनी ती जागृत करण्याचे खूप मोठे कार्य केले. देशातील युवकांना त्यांनी आव्हान केले होते की, 'उत्तीफल जागृत प्राप्य वरान्विबोधत' उठा जागे व्हा आणि जोपर्यंत ध्येय प्राप्त होत नाही तोपर्यंत थांबू नका .

उठा! जागे व्हा वस्तुत: कोणीही दुर्बल नाही. आत्मा हा सर्वशक्तिमान अनंत व सर्वज्ञ आहे. उठा, आपले खरे स्वरुप प्रकट करा, तुमच्या आत वसत असलेल्या ईश्वराची घोषणा करा. स्वत:ला आपल्या सत्य स्वरुपाची शिकवण द्या. निद्रिस्त जीवाला हाक द्या आणि पाहा तो कसा जागृत होतो ते. या त्यांच्या आव्हानात, उपदेशात आत्मनिर्भरतेचा अर्थ दडलेला आहे. तो तरुणांनी समजून घेतला पाहिजे. त्याप्रमाणे स्वत:तील सुप्त गुणांचा वापर करुन नवनिर्मिती करायला हवी

२०१८ मध्ये भाजपाने ग्रामस्वराज अभियान हाती घेतले होते. प्रत्यक्ष खेडयामध्ये काही दिवस राहून शेतकरी व ग्रामीण कारागीराची विकास योजना तळापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न हा या अभियानाचा केंद्रबिंदू होता. शेतमालाला योग्य भाव मिळविण्याची संधी शेतकऱ्याला उपलब्ध व्हावी यासाठी कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेत केलेल्या सुधारणा, अन्न प्रक्रिया उद्योगांवर दिलेला भर आणि कृषी

आधारित व नवउद्योगांना चालना देण्याचे धोरण ही सर्व ग्राम स्वराजाच्या दिशेने उचललेली पावले होती. ग्रामस्वराज्य ही मूलत: महात्मा गांधीनी मांडलेली संकल्पना आज पंतप्रधान ज्या आत्मनिर्भरतेची हाक देत आहेत, ती तिचेच एक रुप आहे.

तसेच आत्मनिर्भरतेची संकल्पना ही गांधीच्या सर्वोदयांच्या कार्यक्रमात सापडते. त्यांनी सांगितलेल्या तेरा कलमी कार्यक्रमात सापडतो. अहिंसेच्या पक्षविरहित राजकीय व्यवस्थेच्या राज्यांत सापडते. आणि आज त्यांच्या या विचारांची गरज देशाला आहे. त्यांनी सांगितलेल्या मार्गाचा आज भारतातील युवकांनी अवलंब केला तर भारत हा निसंशय संकटातून बाहेर पडू शकेल. संकटाचे निरासन त्यांनी सांगितलेल्या रामराज्य, ग्रामराज्यात आहे.

भारतामध्ये कसे कोवीडच्या काळात टाळेबंदीमुळे भारत आर्थिक संकटात सापडला. देशाला या आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकारने स्वावलंबी भारत अभियान सुरु केले. आणि यादव्ारे देश आर्थिक संकटातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' मनरेगा अतंर्गत संपुर्ण देशातील ग्रामीण कुटुंबाना वित्तीय वर्षात १०० दिवस प्रती कुटुंब अकुशल रोजगाराचा हक्क प्राप्त होण्यास मदत झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे जग हे जवळ आले आहे. त्यातच इंटरनेटचा वापर भारतामध्ये जवळपास सर्वच क्षेत्रामध्ये केल्या जातो. त्याचा वापर युवा वर्गामध्ये जास्त प्रमाणात केल्या जातो. त्यामुळे भारतातील तरुणांनी स्वत:मधील कला, कौशल्याचा वापर करुन नवनिर्मिती केली तर आपला देश हा या संकटकाळातून सुखरुप बाहेर पडेल अशी आशा बाळगणे चुकीचे होणार नाही असे मला वाटते.

**विद्या सोमनाथे**
एम.ए. अंतिम वर्ष राज्यशास्त्र

# सुविचार

विजयामुळे उतू मातू नकोस, पराजयामुळे कष्टी हाताश होऊ नकोस हा भारतीय संस्कृतीचा महान संदेश आहे, जयापराजयांना काटीत छाटीत पुढे जावयाचे जयाचे वा पराजयाचे साक्षी व्हावयाचे.

**-सानेगुरुजी**

केवळ पुस्तके वाचून ढिगभर ज्ञान साठविणे म्हणजे ते ज्ञान जीवनात उतरविणे म्हणजे विद्या.

**- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**

जसा तुम्ही विचार कराल, जसे तुम्ही चिंतन कराल तसेच तुम्ही व्हाल जर तुम्ही स्वत:ला दुर्बळ समजाल तर तुम्ही दुबळेच व्हाल तेजस्वी मानाल तर तेजस्वी व्हाल.

**- स्वामी विवेनानंद**

सामर्थ्य हा मनुष्याचा सर्वश्रेष्ठ गुण आहे.

**- प्रेमचंद**

स्त्री ही दुर्बल नाही, पुरुषापेक्षा ती थोर आहे, निस्वार्थ त्याग, नम्रता, श्रद्धा व ज्ञान या गुणांची ती सगुण मूर्ती आहे.

**-महात्मा गांधी**

दया ही अशी भाषा आहे की जी बहिऱ्यालाही ऐकायला येते आणि मुक्यालाही समजू शकते.

**- महावीर**

जीवन किती वर्ष जगलात याला महत्त्व नाही, जीवन कसे जगलात या महत्त्व आहे.

**- रणजीत देसाई**

चांगल्या गोष्टी आपल्याला आमंत्रणे पाठवतील अशी वाट पाहू नये आपणच त्याच्याकडे धावत जावे.

**-आचार्य अत्रे**

साहित्याची शक्ती परमेश्वराच्या बरोबरची आहे.

**-विनोबा भावे**

जुलमाने विचार मरत नाही, उलट ते सुदृढ होत राहतात

**-मॅझिनी**

सत्यासाठी सर्व गोष्टींचा त्याग होऊ शकेल परंतु सत्याचा मात्र कोणत्याही गोष्टीसांठी त्याग होऊ शकत नाही.

**- स्वामी विवेकानंद**

स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो कठीण समय येता कोण कामास येतो.

**-रघुनाथ पंडित**

शब्द हे शस्त्र आहे, त्याचा वापर जपून करा. शिक्षण हे वाघिणीचे दूध असून ते सहसा कुणाला मिळत नाही, ते प्राप्त करावे लागते.

विचार परिपक्व झाले की, शब्दांचे रुप घेवून कागदावर उतरवता येतात.

उत्तम सौंदर्य म्हणजे मनाचे पावित्र्य होय.

परिपूर्ण कष्टाने मिळालेला आनंद योगा योगाने मिळालेल्या आनंदापेक्षा केव्हाही द्विगुणीत असतो.

सोन्याचा अलंकार फक्त शरीर चमकवू शकतो पण, ज्ञानाचा अलंकार सर्व जग चमकवू शकतो.

विनयशीलता हाच माणसाचा अत्युत्तम अलंकार होय.

**- विनोबा भावे**

आपले चुकते पाऊल जो फिरवतो आणि जाणारा तोल जो सावरतो तो खरा मित्र आहे.

**- ना. सी. फडके**

कल्पना जीवनात उपयोगी पडते खरी, पण तिला मोकाट सोडली तर धड प्रपंच नाही व धड परमार्थ नाही अशी अवस्था होते.

- **समर्थ रामदास स्वामी**

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे,उदास विचारे वेच करी

**- संत तुकाराम**

यशाबद्यलची माझी निष्ठा कणखर असेल तर मला अपयशामुळे कधीच नैराश्य येणार नाही.

**- डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम**

कुछ अलग करना हो तो भीडसे हट के चलिए

भीड साहस मे देती हे मगर पहचान छिन लेती है

**- गुलजार**

स्वर्गापेक्षा चांगल्या पुस्तकांचे मी अधिक स्वागत करीन

कारण पुस्तके जिथे असतील तिथे स्वर्ग निर्माण होतो

**- लोकमान्य टिळक**

भाषण व वर्तन यातील परस्पर विरोध हा आमच्या लोकांचा राष्ट्रीय दोष आहे.

**- गो.ग. आगरकर**

## हार्दिक अभिनंदन उज्ज्वल यशाची आकाशझेप.......




Ku. Khushbudevi Gautam 1 st Merit, Political Science, RTM Nagpur University Nagpur 2019-20




Dr. Sandeep Tundurwar, Head, Dept. Pol Science 1st Merit, Gandhian Thought, RTM Nagpur University Nagpur 2019-20



Rasika Chaube 2 nd Merit Political Science RTM Nagpur University 2019-20



Pranali Patil 4th Merit Political Science RTM Nagpur University 2019-20



Krushna Dahikar Qualify SET Exam 2019 & 7th Merit of Political Science RTM Nagpur University 2019-20



Ashvini Raghute 9th Merit Political Science RTM Nagpur University 2019-20





Tanaya Zadkar 9th Merit B.A RTM Nagpur University 2019-20



Dipakkumar Tidake qualify SET Exam 2019



Pravin Sidam qualify SET Exam 2019

# क्रीडा विभाग

राष्ट्रीय, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय नैपूण्य
उज्ज्वल यशाची आकाशझेप.......




26 January 2021






Republic Day







# SHRI BINZANI CITY COLLEGE

## Umrer Road, Nagpur

## Activities of the College: 2020 - 2021

| S.N. | Title | Organizer | Duration | Dates |
|---|---|---|---|---|
| 01 | Foundation Day | | One Day | 17th July 2020 |
| 02 | Vachan Prerna Din - Poster & Slogan Competition | NSS - Dr Raghatate | One Day | 15th Oct 2020 |
| 03 | Student Induction Program - Vidyarambha | Dr Kane, Dr Raghatate, Dr Gharat | One Week | 26th Oct to 31st Oct 2020 |
| 04 | Short Term Training Program (STTP) on Advanced E-learning Tools and Techniques | Dr Sujit Metre | One Week | 26th Oct to 31st Oct 2020 |
| 05 | Collaborative Activity - Training Program for PowerGrid Corp of India Employees | Dr Sujit Metre | Three Days | 2nd Nov to 4th Nov 2020 |
| 06 | Workshop on 'Health, Nutrition and Yoga' in collaboration with S K Porwal College, Kamptee | Sports Dept - Dr Sanjay Choudhari | One Week | 26th Oct to 31st Oct 2020 |
| 07 | Inauguration of Marathi Literary Association - Guest Lecture - Dr Devanand Sontakke, Asst Prof, D P Bhosle Mahavidyalaya, Koregaon | Dept of Marathi- Dr Narendra Gharat | One Day | 9th Nov 2020 |
| 08 | Collaborative Online FDP on qualitative teaching-learning in post Covid 19 era | CP & Berar College, S B City College and SBMM | Three Days | 19th Nov to 21st Nov 2020 |
| 09 | Camp of RT-PCR Testing for COVID 19 | NSS Department - Dr Raghatate | One Day | 25th Nov 2020 |
| 10 | Constitution Day | Dept of Political Science & NSS | One Day | 26th Nov 2020 |
| 11 | State - level Seminar in collaboration with Pradhyapak Parishad, RTMNU and Gondwana University, Gadchiroli. | Dept of Marathi - Dr Gharat, Dr Naikwade | Two Days | 4th & 5th Dec 2020 |
| 12 | Mahaparinirvan Din | Dept of Commerce | One Day | 6th Dec 2020 |
| 13 | One Week Online Workshop on "Games New Rules, Regulations and Benefits" | Dept of Sports, S B City College, S K Porwal College, Kamptee, Arts College, Sihora, Shriniketan Arts & Commerce College, Nagpur, and D D Bhoyar College of Arts and Science, Mouda | One Week | 7th Dec to 12th Dec 2020 |
| 14 | Collaborative activity on 'Human Rights' | Dept of Political Science with Dr V M Peshwe Research Institute | One Day | 10th Dec 2020 |
| 15 | Krantijyoti Savitribai Jayanti - Guest Lecture by Adv Mukta Ranade on 'Women's Property Rights' | Lifelong Learning & Extension Cell & NSS | One Day | 3rd Jan 2021 |

# DEPARTMENT OF ECONOMICS

## ACTIVITY REPORT (2021)

One Day Seminar was held by Economics Department on the topic ' skill Development Employment and entrepreneurship' .This Academic Program Was Jointly Organized by Sri Binzani City College And Smt Binzani Mahila Mahavidyalaya On Dated 1..10.2021 .Dr Harishji Rathi ,The Secretary Of Nagpur Shikshan Mandal Was The President Of The Event. The Principal of S.B .City College Dr. Sujit Metre Sir and the Officiating principal of the smt.Binzani City Colleg Deepashree Patil were presented as a guide for the program.

The keynote speaker at the event was of the skill development Assistant commissioner Shri Prabhakar Harde Sir. Harde sir guided the students about various schemes that come under the skill development . skill development education free for the students. How students employ themselves sir about how to establish guided the students .

The program was conducted by Dr.Archana Anturkar ,contributory lecture in Economics s.b.city college and vote of thanks was done by Hod of Economics Dept Dr.Vasanti Nichkawade mam. The program was attended by 72 participants. The event was held in a virtual manner at The college .

# Department of Political Science

## पी.व्ही. नरसिंहराव जन्मशताब्दी व्याख्यानमाला

## विशेष अतिथी व्याख्यान अहवाल

# पी. व्ही. नरसिंहराव कल्पकतापूरक धोरणांचे निर्माते

भारतात उदारीकरणाचे पर्व पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात सुरू झाले ज्यामुळे भारताची कुंठीतावस्थेत गेलेली अर्थव्यवस्था प्रवाहित झाली. पी. व्ही. नरसिंहराव त्यामुळेच उदारीकरणाचे प्रवर्तक वा शिल्पकार मानले जातात. आर्थिक आघाडीवरील त्यांचे योगदान सर्वश्रुत आहेच त्यासोबतच त्यांच्या कार्यकाळात राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अधिक तापदायक ठरलेल्या लिट्टे, उल्फा, बोडो, पंजाब, जम्मू-काश्मिरातील फुटीरतावादी गटाचे मनसुबे उधळून लावत देशांतर्गत राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सुदृढ बनवलेत त्यांच्या या योगदानाकडे फारसे लक्ष जात नसल्याने पी. व्ही. नरसिंहरावांच्या कार्यकाळाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होऊ शकले नाही असे प्रा. परिमल यांनी स्पष्ट केलेत. श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मंडळ आणि नागपूर शिक्षण मंडळाने त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्रारंभ केलेली व्याख्यानमाला त्यांच्या कार्याला उजाळा देण्याच्या दृष्टीने महत्वाची असल्याचे प्रा. परिमल यांनी स्पष्ट केलेत.

माजी विद्यार्थी मंडळ आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेतील व्दितीय पुष्प प्रा. परिमल यांनी गुंफलेत. पी. व्ही. नरसिंहरावांच्या परराष्ट्रीय योगदानाचा याप्रसंगी त्यांनी मागोवा घेत भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर उंची निर्माण करून देण्याचे कार्य केलेत. अमेरिकेचा दृष्टीकोन बदलण्याकरीता त्यांनी घेतलेले सायास किती महत्त्वाचे होते हे इस्त्राएलच्या उदाहरणावरून लक्षात येते. भारताने इस्त्राएलला स्वतंत्र देश म्हणून मान्यता दिली आणि त्यानंतरच अमेरिकेचा भारताप्रतीचा व्यवहार बदलू लागला. वर्तमानात वावरणाऱ्या भारताच्या विश्वासाचा पाया पी. व्ही. नरसिंहराव यांनी विस्तारला त्याचे सुपरिणाम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आज भारत अनुभवतो आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिलेले वळण यामुळे भारत जागतिक मंचावर महत्त्वाचा भाग ठरलेला आहे. देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आखलेली त्यांची धोरणे म्हणूनच कल्पकतापूरक ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री ए. के. गांधी याप्रसंगी अध्यक्षस्थानी होते. पी. व्ही. नरसिंहराव महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राहिलेत हे संस्था आणि महाविद्यालयाच्या दृष्टीने भूषणावह असल्याचे त्यांनी नमूद केले. रूतलेला आर्थिक गाडा गाळातून बाहेर काढत तिला नवसंजीवनी देण्याचे त्यांचे धारिष्ट्य आज भारताच्या जागतिक मंचावरील स्थान निर्मितीस सहाय्यभूत ठरलेत. विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे भारताचा होत असलेला प्रवास त्यांच्या दुरदृष्टीचे द्योतक असल्याचे स्पष्ट केले. आभासी दूरदृश्यप्रणालीव्दारे आयोजित या कार्यक्रमाची रूपरेषा आणि नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आखण्यात आली व त्याला मुर्त स्वरूप मिळाले. याप्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. हरिष राठी यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि भूमिका माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र वाटाणे यांनी मांडली. प्रमुख अतिथींचा परिचय राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप तुंडूरवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन कु. साक्षी नागमोते यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. नरेंद्र घरत यांनी केलेत. तांत्रिक बाजू डॉ. प्रांजली काणे आणि डॉ. संजय चौधरी यांनी सांभाळली. व्याख्यानाला विद्यार्थी, प्राध्यापक, माजी विद्यार्थी, व्यवस्थापन सदस्य, संशोधक यांची उपस्थिती होती.

# Department of Political Science

## पी.व्ही. नरसिंहराव जन्मशताब्दी व्याख्यानमाला

## विशेष अतिथी व्याख्यान अहवाल

# राजकारणातील निर्लेप व्यक्तित्व : पी. व्ही. नरसिंहराव

राजकीय आणि राष्ट्रीय राजकारणात जवळजवळ सहा दशके सतत कार्यमग्न राहूनही निर्लेपता जोपासलेले व्यक्तित्व म्हणून पी. व्ही. नरसिंहरावांची भारताच्या इतिहासात कुणाला पटो अथवा न पटो नोंद राहिल हे निश्चित! भारतीय राजकारणातून १९९८ ला बाहेर पडल्यानंतर तर त्यांच्या मृत्युपर्यंत त्यांनी स्वत:ला साहित्याच्या क्षेत्रात वाहून घेतले. मृत्युसमयी त्यांच्याकडे जमा नसणारी पुंजी त्यांची निर्लेपता सिद्ध करणारी आहे. पूर्ण निष्ठा आणि श्रद्धा या बाजूंना शेवटपर्यंत जोपासून त्यांनी राष्ट्रीय काँग्रेस आणि गांधी परिवारांशी आपले नाते कायम राखले होते. महत्त्वाचे म्हणजे देशाची अर्थव्यवस्था कृत्रिम श्वसनावर होती तिला त्यातून बाहेर काढून अर्थव्यवस्थेला उभार देतानाच राष्ट्रीयत्वाला अधिक अभंग करण्याचा प्रयत्न केला. १९९१ मध्ये उदारवादाचा स्वीकार करण्यावर अनेकांनी आक्षेप नोंदविला असला आणि समाजवादाला मुरड घातली अशी टिका झालेली असली तरी आजचा वर्तमान भारत पी. व्ही. नरसिंहरावांच्या द्रष्टेपणामुळेच खंबीरपणे उभा असल्याची स्पष्टत सुरेश व्दादशीवार यांनी ठामपणे प्रतिपादली.

पी. व्ही. नरसिंहराव श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राहिलेले आहेत. त्यांच्या स्मृती निमित्ताने सुवर्ण महोत्सवी जन्मशताब्दी कार्यक्रमाचे आयोजन माजी विद्यार्थी मंडळ आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या वतीने करण्यात आलेत. त्याचे प्रथम पुष्प सुरेश व्दादशीवार यांनी गुंफले. पी. व्ही. नरसिंहराव व्यक्तीत्व आणि कार्य यावर प्रकाश टाकताना ते म्हणालेत, निजामाच्या जुलमी जोखडातून मुक्त करण्याकरीता स्वामी रामानंद तिर्थाच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात त्यांनी सर्वस्व झोकून दिलेत. घरातील वातावरण स्वातंत्र्य आंदोलनाला वाहून घेणारे असल्याने त्यांनीही विद्यार्थीदशेत आंदोलनात उडी घेतली. विद्यार्थी म्हणून त्यांच्या ठायी असणारी बहुश्रुतता पूढे त्यांना राजकीय पटलावर कामी आली. देशातल्या जवळपास १७ भाषातून ते सहजतेने संवाद साधित. गांधी, विनोबा यांच्यानंतरचे ते शेवटचे बहुभाषीक ठरलेत. मराठी साहित्याच्या व्यासपीठावरून त्यांनी मराठीत केलेत भाषण आजही तेवढच ताज आणि स्मृती चाळवणार आहे. विद्यार्थी म्हणून असणारी श्रवणता आणि लेखक म्हणून उमटलेलं साहित्यातील प्रतिबिंब पाहू जाता त्यांचे व्यक्तीत्व तत्वज्ञ शासकाप्रमाणे राहिल्याचे नमूद केलेत.

नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आणि या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री ए. के. गांधी यांनी ''देशाच्या व्यवस्थेचे चरित्र राजकीय विचारधारावर आधारलेलं असतं ही बाब जेवढी वास्तववादी तितकेच व्यवस्थेचा पाया त्या देशाच्या अर्थसक्षमतेवर अवलंबून असतो.'' ही अर्थसक्षमता पी. व्ही. नरसिंहराव यांनी निर्माण करून दिली, त्यामुळेच आजच्या कठीण प्रसंगात मार्ग काढणे शक्य होत असल्याचे प्रतिपादन केले. पी. व्ही. नरसिंहराव सारखं व्यक्तित्वाच नाव नागपूर शिक्षण मंडळाशी जोडलं जाणं आमच्या करीता सन्मान आणि आनंदाचा भाग आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुजीत मेत्रे यांनी केलेत. नऊ दशक जुन्या या वास्तूतून अनेक प्रकाशशलाका देश-विदेशात प्रकाशमान करण्यास बाहेर पडल्या. त्यातील एक नररत्न पी. व्ही. नरसिंहराव होत. त्यांच्या सुवर्णमहोत्सवी जन्मशताब्दीच्या निमित्ताने गतस्मृतीना उजाळा देत महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना आणि बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन देता यावे या हेतूने उपक्रम राबविल्या जातोय.

आपला संपन्न वारसा जागता राहावा हा प्रयत्न असल्याचे विशद केले. उपक्रमाची रूपरेशा भूमिका आणि प्रमुख वक्ते प्रा. सुरेश व्दादशीवार यांचा परिचय डॉ. राजेंद्र वाटाणे, अध्यक्ष माजी विद्यार्थी मंडळ, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्पित पोतदार, सचिव, माजी विद्यार्थी मंडळ यांनी खुमासदार शैलीत केलेत. आभार प्रदर्शन डॉ. संदीप तुंडूरवार, राज्यशास्त्र विभाग यांनी केलेत. तांत्रिक सहाय्यची बाजू अत्यंत सक्षमपणे डॉ. प्रांजली काणे, डॉ. विजय वानखेडे यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे सफल आयोजन माजी विद्यार्थी मंडळाचे समन्वयक डॉ. संजय चौधरी, डॉ. नरेंद्र घरत यांनी कुशलतेने केले.

# VIDYARAMBH

## Student Induction Program - 2020-2021
## REPORT
## (26th Oct to 31st Oct 2020)

A One-Week Online Student Induction Program - VIDYARAMBH- was organized for all the First Year students of Arts & Commerce by the IQAC of Shri Binzani City College, Umrer Road, Nagpur. Principal Dr Sujit Metre presided over the inaugural function and forwarded the introductory remarks. He acquainted the students with the history of the Institution which is 90 years old and spoke of the various courses available with the varied Cells and Committees of the College.

Resource Person Maj Gen (Retd) Dr Subhash Chandra Pareek, Jaipur, spoke on the World of Defence detailing the requirements needed to make a career in the Defence Forces. Dr Shraddha Deshpande, Asst Prof (English), Dharampeth MP Deo Memorial Science College, Nagpur, gave a presentation on Listening Skills. Shri Amar Damle, Asst Prof (Psychology) Shrimati Binzani Mahila Mahavidyalaya, Nagpur, spoke on Mental Health & Motivation.

Shri Ashish Thengre and Shri Sushant Bhagat of Career Campus, Nagpur, guided the students in 'How to prepare for Competitive Exams. They dealt with Quantitative Aptitude and Language. Ms Ishita Chatterjee, HR-TCS, interacted with the students. She shared the expectations of the industry from the freshers, how they should groom themselves and have short term goals. An Online Dance session (Garba pattern) was conducted by Alumni Akash Gharad and Pritam Ghyar while a session on the basics of sketching was conducting by Rajat Tirpude, a student of Commerce of the College.

Dr Sandeep Tundurwar, Dr Narendra Raghatate, Dr Narendra Gharat and Dr Pranjali Kane conducted the proceedings of the various sessions.

# राज्यशास्त्र विभाग




Higher Learning Programme Dr. Khandewale Sir




Higher Learning Programme Dr. Vikas Jambhulkar Sir



Shri Vivekanand Nartam delivered lecture in lecture series on State Sovereignty and Human Rights



Shri Atul Kahate delivered lecture in Lecture Series on Israel-Palestine Crisis




Mrs. Rosy gupta delivered lecture in Lecture Series on Central Vista Project in Perspective of Heritage of Delhi



Dr. Khyatimay Tripathi delivered lecture on Human Rights.




Dr. Rayan Mahajan delivered lecture on Human Rights.



Shri Bhaskar Waghale delivered lecture on seven decade on Indian Constitution




Shri Kishor Naitam delivered lecture on seven decade on Indian Constitution
















# मराठी विभाग


## मराठी साहित्य अभ्यास मंडळ उद्घाटन समारंभ



## द्विदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

















## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यान





## स्व.श्री. आईदानजी बिंझाणी स्मृती व्याख्यान










# मराठी विभाग

## मराठी भाषा गौरव दिन समारंभ










# विविध कार्यक्रमांचे ओझरते दर्शन













# निष्ठा प्रखर राष्ट्रीयत्वाची

## राष्ट्रीय सेवा योजना



“RTPCR TEST PROGRAMME”



“CONSTITUTION DAY PROGRAMME”



“SAWITRIBAI PHULE JAYANTI PROGRAMME”





“NATIONAL YOUTH DAY PROGRAM”



“NATIONAL VOTER'S DAY”



“PULSE POLIO CAMPAIGN PROGRAMME”




“INTERNATIONAL WOMEN'S DAY PROGRAMME”



“ANTI TERRORIST DAY (PLEDGE) ACTIVITY”

# REPORT

## “VACHAN PRERNA DIN”

(Dt. 15th October 2020)

On the occasion of the birth anniversary of Late Ex- President of India Dr. APJ Abdul Kalam, we celebrate “VACHAN PRERNA DIN” (15th October). The NSS unit of our college held the 'Poster making Competition' and 'Slogan Making Competition'. The theme of the slogan and Poster making competition is 'Reading Habits'. Ten posters and eight slogans we received through students. And first prize of Slogan comp. goes to Mr. Sahil Borkar and Poster Comp. first prize goes to Shri. Rajat Tirpude.

The program was conducted by Dr. Narendra Raghatate, NSS Coordinator. Dr. Mohini Bherwani Co-coordinator of NSS Unit also works hard for making this program success.

Links of Poster Completion :
https://forms.gle/YkQoducNGbUYgE2N8
Links of Slogan Completion :
https://forms.gle/2fpx4o9Tvi8nHijh6

## “RTPCR TEST PROGRAMME”

(Dt. 25th November 2020)

NSS Unit organized a “RTPCR TEST Program” for students, teaching and non-teaching staff on 25th November 2020 in our college.

The Nagpur Municipal Corporation facilitates a Vehicle (Bus) with Medical Staff of 'COVID 19' for testing. They enrolled for testing, registered online and took sample for test and sent to Govt. Medical College.

Around 64 Teaching, non teaching, administrative staff and students of our college gave samples for testing and near about 95% of testing result was 'NEGATIVE'.

# Report On
# " Two Day Online International Conference "
# On
# " Understanding Implications of VUCAFU World "

A Two-Day International Conference on "Understanding Implications of VUCAFU World " was held at Shri Binzani City College in collaboration with Kavikulguru Kalidas Sanskrit Vishwavidyalaya (KKSU), Ramtek as a part of Research Activity by coordination of the Department of Sanskrit & IQAC on 26th and 27th June 2021. The Conference had four technical session where keynote and paper presentation was held.

**College :** Shri Binzani City College , Nagpur

**Event :** Understanding Implications of VUCAFU World

**Date :** 26th and 27th June 2021

**Venue :** Online Platform (Zoom)

**Aims & Objective :-** Enables the students -

1. To understand the various dimensions of VUCAFU World
2. To discuss various implications of VUCAFU World
3. To understand Business Development of VUCAFU World
4. To understand the concept of Sustainable Investing in the context of VUCAFU
5. To deliberate the Kautilya's wisdom on HR management in new normal
6. To discuss the economic policy framing in VUCAFU World

**Process :** The Conference's Inaugural function was presided over by President of NSM, Hon'ble Shri A.K. Gandhi, while Dr. Vijaykumar Menon , Dean - Vedavidya & Registrar, KKSU, Ramtek was the Guest of Honour. The keynote address was delivered by Dr. A.A. Paturkar, Dean, Academics, Dr. Ambedkar Institute of Management Studies & Research and the Introductory speech was given by Dr. Sujit Metre, Principal, Shri Binzani City College, Nagpur.For this International Programme member of NSM Dr. Harish Rathi (Secretory), Adv. Rajeev Deo etc. was present.

On the first day(26th June), there were two technical Sessions in which First Resource persons Mr. Mukesh Sasankar, Accounts Manager, Zensar Technologies, Portland, USA and Second Resource persons Mr. Amit Munje, Relationship Manager, HSBC Bank, PLC, London, UK gave presentations. It was followed by Paper Presentations by four Research Scholars.

On the second day(27th June), there were two technical sessions in which Third Resource persons Dr. Mrudula Naseri, Ex - Officiating Principal and HoD of Sanskrit while the fourth Technical Session was presented by Dr. Pranay Parashar, Assistant Professor, Department of Commerce & Financial Studies, Central University, Jharkhand. It was followed by Paper Presentations by Five Research Scholars.

After this session, Dr. Chandragupta Shridhar Warnekar , Ex-Principal, Cummins College, Pune, Guest of Honour of the Valedictory Programme introduced a motivational speech on the relevant topic. Dr. Sandeep Tundurwar, Vice Principal and HoD(Political Science), President of the Valedictory Programme. The programme was conducted by Dr. Pallavi Rajankar (Dept. of Sanskrit), Dr. Pranjali Kane (IQAC Coordinator) & Dr. Narendra Raghatate (IQAC Co-coordinator).

**Conclusion :** VUCA is an acronym(artificial word), first used in 1987 and based on the leadership theories of Warren Bennis and Burt Nanus and

stands for Volatility, Uncertainty, Complexity and Ambiguity. It was the response of the US Army War College to the collapse of the USSR in the early 1990s. Suddenly, there was no longer the only enemy, resulting in new ways of seeing and reacting.(https://www.vuca-
wo rld .o rg/ )

Volatility, Uncertainty, Complexity and Ambiguity

(VUCA) as a concept emerged when the innovation

became the rule. This VUCA has changed the way we function and perceive the world. It was soon referred to as the New Normal. Then the world was hit by pandemic and soon we had that Fear of Unknown and Unprecedentedness as the two new dimensions added to VUCA making it VUCAFU world. The new "New Normal" has forced us to rethink the way we learn, teach, train, plan, innovate, invest.... and so on.

This Conference is trying to provide a platform for all researchers, teachers and practitioners to discuss and debate on the emerging VUCAFU World. The experts from USA and UK shall be infusing their version of VUCAFU and also, we will go back to visit the ancient Indian wisdom on this issue.

Total No. of Participant : 85

## (Department of Sanskrit)
## Report On
## " The Importance of study of Language at present "

The Online programme is systematize for all language students and literary person organized by Department of Sanskrit & Hindi Collaboration on 1st June 2021 at 1 p.m. through Zoom Link.

**College :** Shri Binzani City College , Nagpur

**Event :** The Importance of study of Language at present

**Date :** 1st June

**Venue :** Online Platform (Zoom)

**Purpose/Objective :-** Enables the students to -

1. Develop their intellectual, personal and professional abilities
2. Share their ideas, thoughts, feeling with others
3. Improve memory, problem - solving and critical thinking skills

**Process :** The guest of this programme Dr. Manoj Pandey

(H.O.D of Hindi Dept. of RTM Nagpur University, Nagpur) introduced a motivational speech on relevant topic. The President of this programme was Dr. Sujit Metre (Principal of S.B.City College)

Dr. Pallavi Rajankar (Dept. of Sanskrit) compered the ovation programme while Dr. Sudha Jangid & Dr. Priyanka Pandit (Dept. of Hindi) conducted the proceedings of complete programme and proposed the vote of thanks.

**Conclusion :** The programme helped to enhance the students to consider the role of language in learning and start out from the assumption that language, and more particularly, linguistic interaction with other people is a key aspect of learning.

Total no. of Participants - 22

## “CONSTITUTION DAY PROGRAMME”

(Dt. 26th November 2020)

NSS Unit and Political Dept. jointly organized an “Constitution Day Program” for students on 26th November 2020. Dr. Sujit Metre, Principal of the college presided over the function. Shri Bhaskar Waghale and Shri. Kishor Naitam Political Dept. of S.B.City College are Main Speakers of this program. and Dr. Sandip Tundurwar HoD. Political Science also present on the occasion.

Shri Bhaskar Waghale speaks on 'Seven Decades of Indian Constitution'. He spoke about the journey of making constitution, important events, creating rights and duties and how the constitution occur. Also Shri Kishor Naitam focus the events of when the constitution implemented and how some imp. points to be neglected. On the occasion Shri Shrikant Shende, Dept. of Political Science read the Preamble. Dr. Sujit Merte speaks on his presidential speech about Fundamental Rights and Duties and offered his wishes for the success of program and told the students to be confident because our self confidence only can bring us success in our life.

The program was compared by Dr. Sandip Tundurwar and the vote of thanks was presented by Dr. Narendra Raghatate, Program In-charge of NSS. Dr. Mohini Bherwani, Dr. Ryan Mahajan, Shri. Lavkush Harmi works hard for make the program successful. A number of students who enrolled in NSS and Students of Dept. Political Science marked their attendance through ONLINE via Zoom Platform for the program and made it successful.

## “SAWITRIBAI PHULE JAYANTI PROGRAMME”

(Dt. 3rd January 2021)


NSS Unit and Dept. of Lifelong and Extension Cell of our College are jointly organized 'Sawitribai Phule Jayanti Program' on 3rd January 2021. Dr. Sujit Metre, Principal of the college presided over the function. Chief Guest Dr. Mohini Bherwan, Dr. Pranjali Kane Coordinator of Lifelong & Extension Cell and other Teaching and Non-teaching staff also present on the occasion.


Chief Guest Dr. Mohini Bherwani garlanded the Photo of Sawitribai Phule and pay tribute to her. Principal, Dr. Sujit Metre also tribute HER and glorified the glimpses of Great Ladies of the World, their work and techniques to do work efficiently on his presidential speech.


